**योजना-विभागामार्फत चालू असलेल्या योजना/योजनेतंर्गत लाभार्थी घटक.**

**या संचालनालयामार्फत खालील योजना राबविल्या जातात.**

**१) प्रथम वर्ग व द्वितीय वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा आणि बाष्पक कार्य अभियंता परीक्षा.**

बाष्पक चालविण्याकरिता, बाष्पकाच्या उष्णता पृष्ठभागानुसार प्रथम वर्ग/द्वितीय वर्ग बाष्पक परिचर/ बाष्पक कार्य अभियंता यांची आवश्यकता असते. त्याकरिता आवश्यक असणारी प्रथम वर्ग व द्वितीय वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा व बाष्पक कार्य अभियंता परीक्षा, या संचालनालयामार्फत घेण्यात येते.

**या योजनेचा लाभ घेणारे घटक.**

कारखान्यामध्ये बाष्पकावर काम करणारे बाष्पक परिचर, बाष्पक कार्य अभियंता व
बाष्पकांचे मालक/वापरदार.

**या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लागणारी कागदपत्रे.**

या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लागणारी कागदपत्रे व प्रकिया या कार्यालयाचे संकेत स्थळ www.mahashramm.gov.in वर उपलब्ध आहे.

**योजनेचा लाभ मिळविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क करण्यात यांवा.**

महाराष्ट्र शासन, बाष्पके संचालनालय, कामगार भवन, ७वा मजला, प्लॉट कमांक-सी-२०, ब्लॉक-ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. दूरध्वनी कमांक-०२२-२६५७११९८/ २६५७१३०४/ २६५७१३५२. फॅक्स कमांक-०२२-२६५७१२८३.

२) या संचालनालयामार्फत सन २०१०-२०११ मध्ये पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, मुंबई, सोलापूर येथे बाष्पकाच्या सुरक्षित व कार्यक्षम वापरासाठी जागरुकता कार्यकमाचे आयोजन केले होते. भविष्यात अशाप्रकारचे कार्यकम या संचालनालयामार्फत राबविण्यात येतील.

**कायदे व नियम :-**

राष्ट्रीय हिताकरीता, जीव आणि मालमत्तेचे संरक्षण आणि संवर्धन करणे तसेच राष्ट्रीय विकासाला गती देण्यास मदतीकरीता खालील बाष्पक अधिनियम/नियम/विनियम यांची अंमलबजावणी, या संचालनालयाद्वारे करण्यात येते.

- **बाष्पक अधिनियम, १९२३**
- **भारतीय बाष्पक विनियम, १९५०**
- **महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२**
- **महाराष्ट्र मितोपयोजक नियम, १९६५**
- **बाष्पक परिचर नियम, २०११**
- **बाष्पक कार्य अभियंता नियम, २०११**

**<u>ध्येय- विभागाचे ध्येय/विभाग सुरु करण्याचे कारण.</u>**

बाष्पक म्हणजे ज्या बंद पात्र साधनात, दाबाखाली बाष्प निर्मिती होते. हे बाष्प ऑईल मिल, कापड गिरण्या, सुत गिरण्या, पेट्रोकेमिकल्स, रिफायनरिज (कच्चे खनिज तेल), दुग्धजन्य खादय व्यवसाय, वीजनिर्मीती इत्यादीसाठी वापरली जाते. या सर्व उद्योगात बाष्पकाची गरज भासते. जरी बाष्पक हा अत्यंत उपयोगी असला तरी त्याच्या स्फोटकतेमुळे तो धोकादायक ठरु शकतो. अपघात हे बाष्पकाच्या स्फोटामुळे होतात व त्यामुळे जिवीत व वित्त हानी होऊ शकते. इ.स.१८६९ मध्ये मुंबईत झालेल्या दोन अपघातात जिवीत व वित्त हानी झाली. म्हणुन इ.स.१८६९ मध्ये मुंबई राज्यात बाष्पक निरीक्षण विभागाची स्थापना करण्यात आली आणि त्यानंतर भारतीय बाष्पक अधिनियम १९२३ राष्ट्रीय पातळीवर अंमलात आला.

त्यानंतर भारत सरकारने 'भारतीय बाष्पक विनियम १९२४' अंमलात आणले व हे विनियम इ.स. १९५० मध्ये 'भारतीय बाष्पक विनियम १९५०' असे बदलण्यात आले.

हया विनियमात बाष्पक नकाशे, बांधणीचा प्रकार, नोंदणीकरण, निरीक्षण नेमून दिलेले प्रमाणपत्र हया इत्यादी संबंधी मार्गदर्शन समाविष्ट केलेले आहे.

या नंतर 'भारतीय बाष्पक अधिनियम १९२३' वर आधारित 'महाराष्ट्र बाष्पक नियम १९६२' आणि 'महाराष्ट्र मितोपयोजक नियम १९६५' अस्तित्वात आले.

भारतीय बाष्पक अधिनियम इ.स. २००७ मध्ये सुधारित होऊन 'बाष्पक अधिनियम १९२३' असा करण्यात आला. नंतर मार्च इ.स.२०११ मध्ये 'बाष्पक परिचर नियम २०११' व 'बाष्पक कार्य अभियंता नियम २०११' असे अस्तित्वात आले.

संचालकांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे व प्रादेशिक कार्यालये पुणे, नागपूर, अहमदनगर, कोल्हापूर, नाशिक व सोलापूर येथे आहेत.

**ध्येय.**

- बाष्पकाच्या सुरक्षेच्या, श्रेष्ठत्वाची वृध्दी करीता वापरात असलेल्या बाष्पकाचे काटेकोरपणे तपासणी आणि जिवीत व मालमत्तेचे, बाष्पक स्फोटांपासून संरक्षण आणि जतन.
- राष्ट्रीय विकासाच्या वृध्दी करीता, बाष्पकांचे उत्पादना दरम्यान दर्जेदार निरीक्षण करणे.
- बाष्पकांच्या सुरक्षित वापराकरीता बाष्पक परिचर आणि कार्य अभियंत्यांची परीक्षा घेऊन सक्षम मनुष्यबळ तयार करणे.
- गतिमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्थेच्या वचनबध्दतेसाठी, प्रक्रियांचे सुलभीकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
- बाष्पक आणि प्रेशर व्हेसल्स यांची निर्मिती, तपासणी आणि अपघातांचे विश्लेषण या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य निरीक्षण संस्था असे श्रेष्ठत्व जोपासण्याकरीता, आंतरराष्ट्रीय संस्थांशी बरोबरी करणे.
- सुपर क्रिटीकल बाष्पकांची निर्मिती/निरीक्षण या क्षेत्राामध्ये आधुनिक पध्दतींचा विकास करणे.
- सौर उर्जेवर चालणा-या बाष्पकांची निर्मिती करणा-या संस्थांना मदत आणि प्रोत्साहन देणे.
- बाष्पक संबंधी समूहामध्ये बाष्पकाच्या सुरक्षित आणि सक्षमपणे वापराकरीता जनजागृती निर्माण करणे.

**प्रश्नावली.**

- **कोणत्या बाष्पकाची नोंदणी करणे आवश्यक आहे ?/ कोणत्या प्रकारच्या वाफ तयार करणा-या संयंत्रांची नोंदणी करणे आवश्यक आहे ?**

  ज्या बाष्पकांची पाणी धारण क्षमता २५ लिटर किंवा त्यापेक्षा जास्त आहे.तयार होणा-या वाफेचा दाब १ कि.ग्रॅ./सें.मी.$^{२}$ किंवा पाण्याचे तापमान १०० अंश सेल्सियस किंवा त्यापेक्षा जास्त आहे.

- **बाष्पकाची नोंदणी कशी करावी ?**

  बाष्पकाची नोंदणी करण्याकरिता संचालक, बाष्पके महाराष्ट् राज्य, मुंबई यांना विनंती अर्ज सादर करावा. अर्जा सोबत भारतीय बाष्पके विनियम, १९५० मधील विविध दाखले. तसेच त्यानुसार बाष्पकाचा तपशील व विहित शुल्क भरलेले चलन जोडावे.

- **बाष्पके कायदा म्हणजे काय ?**

  या कायदयाला बाष्पके कायदा १९२३ असे संबोधले जाते. हा केंद्र शासनाचा कायदा भारतातील सर्व राज्ये तसेच केंद्रशासीत प्रदेश (जम्मु व काश्मीर वगळून) लागू आहे. बाष्पक निर्मितीसाठी तसेच बाष्पक वापरासाठी कायदयातील तरतुदींनुसार भारतीय बाष्पके विनियम १९५० तयार करण्यात आले आहेत.

- **कोणत्या प्रकारचे बाष्पके बाष्पक परिचारकाच्या अधिपत्याखाली येत नाहीत ?**

  भारतीय बाष्पक विनियम, १९५० मधील प्रकरण १४ नुसार तयार झालेल्या कॉईल टाईप बाष्पके ज्यांची पाणी धारण क्षमता १५० लिटर असुन कमाल वापरदाब १२ कि.ग्रॅ./सें. मी२ एवढा आहे. तसेच शेल टाईप बाष्पके ज्यांची पाणी धारण क्षमता ५०० लिटर असून कमाल वापरदाब ७ कि.ग्रॅ./सें.मी.२ आहे. अशी बाष्पके बाष्पक परिचारकाच्या अधिपत्याखाली असणे आवश्यक नाही. तथापि असे बाष्पके दहावी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या अधिपत्याखाली असणे आवश्यक आहे.

- **पाणी गरम करणारे संयंत्र व वाफ तयार करणारे संयंत्र यात काय फरक आहे ? व कोणत्या संयंत्रांची कायदयानुसार नोंदणी करणे आवश्यक आहे ?**

  ज्या संयंत्रामध्ये पाण्याचे तापमान जास्तीत जास्त १०० अंश सेंटीग्रेड पर्यंत वाढविले जाते. त्यास पाणी गरम करणारे संयंत्र म्हणतात व त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु ज्या संयंत्रामध्ये पाण्याचे तापमान १०० अंश सेंटीग्रेड पेक्षा जास्त वाढविले जाते. अशा संयंत्रांना वाफ तयार करणारे संयंत्र म्हणतात व त्यांची बाष्पके अधिनियम १९२३ नुसार नोंदणी करणे आवश्यक आहे अथवा या संचालनालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

- **बाष्पकाचे उघडया स्वरुपातील निरीक्षण म्हणजे काय ? ते कसे करतात ?**

  बाष्पकाच्या भागांवरील आच्छादित इन्सुलेशन व लॅगिंग काढून करण्यात येणा-या निरीक्षणास उघडया स्वरुपातील निरीक्षण म्हणतात. असे निरीक्षण बाष्पक निर्मितीपासून प्रत्येक दहा वर्षांनी करण्यात येते.

- **रेमनन्ट लाईफ असेसमेंट स्टडी(RLA Study) म्हणजे काय ?**

  शेल टाईप बॉयलरमध्ये बाष्पकाचे वय २५ वर्षे झाल्यावर त्याचा वापरदाब भारतीय बाष्पके विनियम १९५० मधील विनियम ३९१ - अे (अे) (१) (२) मध्ये दिलेल्या तक्त्यानुसार कमी करावा. वॉटर टयुब बॉयलर्स जे ४०० अंश सेंटीग्रेड किंवा त्यापेक्षा जास्त तापमानावर चालतात तेव्हां अशा बाष्पकांचे १,००,००० तास चालल्यानंतर भारतीय

बाष्पके विनियम १९७० मधील विनियम ३९१ (अे) (बी) (२) मधील तक्ता - १ नुसार करावे आणि इतर सर्व वॉटर टयुब बॉयलर्स २५ वर्षानंतर त्याच्या तक्ता - २ नमुद केलेल्या चाचंण्या घेण्यात याव्यात.

- **बाष्पक परिचर / बाष्पक कार्य अभियंता यांचे करिता कोण परिक्षा घेतात आणि त्यासाठी अटी व शर्ती काय ?**

  वरील परीक्षा संचालक बाष्पके यांच्याकडून घेण्यात येतात. परिक्षासंबंधी सर्व अटी व शर्ती बाष्पक परिचर नियम, २०११ व बाष्पक कार्य अभियंता नियम २०११ मध्ये दिल्या आहेत.

- **बाष्पक परिचर व बाष्पक कार्य अभियंता परिक्षा कधी व कोठे व किती वेळा घेण्यात येतात ?**

  बाष्पक कार्य अभियंता परिक्षा वर्षातून दोन वेळा मे आणि डिसेंबर महिन्यात मुंबई येथे घेण्यात येते. बाष्पक परिचर परिक्षा वर्षातून पाच वेळा घेण्यात येतात पैकी मुंबई येथे फेब्रूवारी, जून व ऑक्टोबर मध्ये तीन वेळा व नागपूर येथे मार्च व सप्टेंबर, अशा दोन वेळा घेण्यात येतात.

- **सांधाता चांचण्या कोठे घेण्यात येतात ?**

  सांधाता चाचंण्या मान्यताप्राप्त तंत्र प्रयोगशाळेत घेण्यात येतात. जसे मेटालॉजीकल सर्व्हिसेस, घाटकोपर, मुंबई, नॅशनल टेस्ट हाउस, अंधेरी, मुंबई नॅशनल टेस्ट हाउस, कोलकत्ता आणि वेल्डींग रिसर्च इन्स्टिटयूट त्रिचरापल्ली.

- **मान्यताप्राप्त बाष्पक दुरुस्तीकार व नलिका बनविणा-या कंपन्यांची यादी कोठे मिळेल ?**

  सदर यादी या संचालनालयाच्या www.mahashramm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- **बाष्पदाब मापी कोठे तपासून मिळेल व त्यासाठीचे शुल्क काय ?**

  बाष्पदाबमापी बाष्पके संचालनालय,मुंबई तसेच विभागीय कार्यालय, पुणे येथे रु.५०रु/- प्रती बाष्पदाब मापी एवढे शुल्क आकारुन तपासून मिळेल.

- **दुय्यम प्रमाणपत्रासाठी लागणारे शुल्क किती ?**

  दुय्यम प्रमाणपत्राच्या प्रत्येक प्रतीसाठी रु.५०/- एवढे शुल्क आकारण्यात येते.

- **सुट्टीच्या दिवशी अथवा कार्यालयीन वेळेनंतर तातडीच्या निरीक्षणाकरिता बाष्पके अधिनियम, १९२३ मध्ये काय तरतूद आहे ?**

  बाष्पके अधिनियम, १९२३ मधील नियम १६ आणि महाराष्ट् बाष्पके नियम १९६२ मधील नियम-४२ नुसार संचालकांच्या विशेष परवानगीने सुटीच्या दिवशी अथवा सूर्यास्तानंतर विशेष भेट आयोजित करता येते, तथापि त्यासाठी लागणारे शुल्क विहीत शुल्काच्या दुप्पट असते.

- **बाष्पक निर्माता म्हणून मान्यता मिळण्यासाठीची पध्दत काय आहे ?**

  ज्या कंपनीस बाष्पक किंवा त्याचे सुटे भाग बनवावयाचे आहेत अशी कंपनी मान्यतेबाबतची प्रश्नावली व विहीत शुल्कासह संचालकांकडे अर्ज सादर करु शकते.